# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शिर्षक | लेखकाचे नांव | पान क्र. |
|---|---|---|---|
| 1 | **जागतिकीकरण : भाषा, साहित्य आणि संस्कृती** | प्रा.डॉ.मा. मा. जाधव | 9 |
| 2 | जागतिकिकरण आणि मराठी कविता : एक आकलन | प्रा. डॉ. बी. बी. खंदारे | 12 |
| 3 | जगतिकीकरणात मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि उपाय | प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, | 15 |
| 4 | मराठवाडी.बोली अभ्यासाच्या दिशा | डॉ. विठ्ठल जंबाले | 21 |
| 5 | बदलत्या काळातील बोलीभाषा : आव्हाणे व उपाय | डॉ. वैजनाथ अनमुलवाड, | 23 |
| 6 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ.रेखा जगनाळे, | 27 |
| 7 | जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्यापुढील आव्हाने व उपाय | अस्मिता विश्वनाथ वांद्रे. | 34 |
| 8 | जागतिकीकरणाच्या युगात मराठी माध्यमातील मुलांना इंग्रजी बोलताना येत असलेल्या अडचणींचा चिकित्सक अभ्यास | डॉ. शामसुंदर गुळभिले | 41 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण साहित्य | डॉ. सपना वाल्मीक सोनवणे | 50 |
| 10 | जागतिकीकरणाच्या वावटळीतील बलुतेदाराची व्यथा | | |
| 11 | मांडणारा कवी : अरुण काळे | प्रा.डॉ. यशपाल भिंगे | 53 |
| 12 | **जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितेवर प्रभाव** | **प्रा. डॉ. डिगोळे विठ्ठलराव** | 53 |
| 13 | जागतिकीकरण आणि नव्वदीनंतरची मराठी कविता।। | डॉ. केशव पाटील | 59 |
| 14 | जागतिकीकरणानंतरच्या शैक्षणिक पडझडीची कविता : पोरगं शेकत बसलंय | प्रा.डॉ.संजय कसाब, | 65 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ. नवीन के. गिलबिले | 69 |
| 17 | जागतिकीकरण : मराठी भाषेची स्थिती, आव्हाने व उपाय | डॉ.रामकिशन नारायण दहिफळे | 72 |
| 18 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने | 75 |
| 19 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.सुरेश शिंदे | 79 |
| 20 | जागतिकीकरण आणि आदिवासी साहित्य | प्रा.डॉ. राजेश धनजकर | 82 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | प्रा. डॉ. मुंढे संगीता | 85 |
| 22 | मराठी भाषेची सद्यःस्थिती आव्हाने आणि उपाय | प्रा.डॉ. शेषराव नाईकवाडे | 88 |
| 23 | जगतिकीकरण आणि आदिवासी लोकसाहित्य | प्रा. डॉ. पंडित शिंदे | 90 |
| 24 | 'तुडवण ' आणि शोषणाचे जागतिकीकरण | प्रा.डॉ. राम रौनेकर, | 94 |
| 25 | जागतिकीकरण आणि कादंबरी | प्रा.डॉ. पंडित रानमाळ, | 96 |
| 26 | जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ.प्रभाकर ना. कऱ्हाळे | 98 |
| 27 | जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदलती महानगरीय मराठी कविता | प्रा.डॉ. जगताप यु. एस. | 101 |
| 28 | जागतिकिकरणाचे संदर्भ अचुकपणे टिपणारी कविता महाजन यांचा 'ग्राफिटी वॉल': एक आकलन | प्रा. डॉ. शारदा कदम . डॉ. कविता लोहाळे | 104 |
| 29 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा.डॉ.गजानन आनंता देवकर , | 107 |
| 30 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा. डॉ. गणपती मोरे | 111 |
| 31 | जागतिकीकरण आणि मराठी साहित्य | प्रा.डॉ.एल.डी.गलंडे | 113 |
| 32 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | डॉ.कालीदास गुडदे | 116 |
| 33 | **जागतिकीकरण**आणिमराठीसाहित्य | प्रा. इंगळे के.एस. | 118 |
| 34 | जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी | डॉ.शंकर विभुते | 123 |
| 35 | जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावरील कृषी जाणीवा | प्रा. डॉ. दुष्यंत कटारे | 125 |
| 36 | 2000 नंतरची मराठी ग्रामिण कादंबरी : एक अभ्यास | प्रा.कृष्णा काशिराम कोटकर | 128 |
| 37 | जागतिकीकरण आणि दलित कविता : एक अभ्यास | प्रा. मारोती गायकवाड | 132 |
| 38 | मराठी भाषेची सद्यःस्थिती, आव्हाने व उपाय नेहा | रतन बनसोडे | 137 |

# मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा

**डॉ. विठ्ठल जंबाले**
प्रमुख, पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग
देगलूर महाविद्यालय देगलूर.

महाराष्ट्रामध्ये मराठी ही प्रादेशिक भाषा, परंतु तिच्या अंतर्गत अनेक बोली प्रचलित आहेत. वऱ्हाडी, डांगी, अहिराणी, खानदेशी, कोकणी इत्यादी मान्यताप्राप्त प्रांतिक बोली आहेत. अलिकडील काळात लेखक - कवी - समीक्षक - अभ्यासक - संशोधक यांच्या प्रयत्नामधून मराठवाडी बोली सिद्ध झालेली आहे, सिद्ध होत आहे. परंतु मराठवाडी बोली ही मराठवाडा मुलुखाची प्रांतिक बोली असून तिच्यामध्ये सर्वत्र सारखेपणा आढळत नाही. सद्यस्थितीत औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगाली, लातूर, जालना या आठ जिल्हयांमध्ये मराठवाडी अंतर्गत खूप भेद आहेत. कित्येक बोली कार्यरत आहेत. कार्यक्षेत्र, समाज, गट, व्यवसाय, लिंग, वंश, वय, जात, धर्म, पंथ, प्रदेश, परिसर या अनेक घटकांना अनुलक्षून बोलींचे निराळेपण गडदपणे प्रत्ययास येते. जागतिकीकरणाच्या रेटयात ग्रामीण संस्कृती आणि समाजजीवन प्रभावित झाले असून या दूरगामी परिणामामुळे संस्कृतीबरोबर भाषा व बोलीवर आक्रमणे होऊन भाषिक संक्रमण घडले आहे, घडत आहे. आज जगातील कित्येक भाषा आणि बोली नष्ट होत आहेत. मृतप्राय ठरत आहेत. मराठवाडी बोली या प्रभावाना अलिप्त ठेवणे शक्य नाही. त्या प्रभावांना अव्हेरून समकालीन भाषावास्तव संमिश्र बनले आहे. या गुणधर्मामधून प्रस्तुत लेखनप्रपंच हाती घेण्यात येत आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये :**

१. भाषाशास्त्रीय संशोधनात खूप मोठी पोकळी आहे. ती भरून निघावी.
२. बोली हा व्यक्तीच्या जगण्याचा एक जिवंत आविष्कार. ते संशोधन वेगाने व्हावे.
३. बोलीभाषेतून प्रादेशिक - सांस्कृतिकदृष्टया सामूहिक अस्मिता जोपासली जाते.
४. साहित्यक्षेत्रात बोलीचा वापर लक्षणीय ठरत आहे. साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहामध्ये बोली हेच साहित्याचे महत्त्वाचे अंग बनले आहे.त्याचा शोध घ्यावा.
५. जागतिकीकरण आणि मराठी भाषा-मराठवाडी बोली व साहित्य यातील आंतरसंबंध जाणून घेणे .
६. मराठी भाषा - मराठवाडी बोली व साहित्य यावरील जागतिकीकरणाच्या प्रभावाची उकल करणे .
७. मराठी बोली - मराठवाडी बोली आणि साहित्य प्रवाह यांच्यावरील जागतिकीकरणाच्या प्रभावाचा मागोवा घेणे.
८. यांत्रिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संदेश यंत्रणेचा (मराठी भाषा ) मराठवाडी बोलीवरील परिणामांचा शोध घेणे.

**शोधनिबंधाची गृहितके**

१) जागतिकीकरणामुळे मराठवाडी बोलीभाषा प्रभावित झाली आहे.
२) जागतिकीकरणामुळे मराठवाडी भाषा व साहित्याच्या प्रचार आणि प्रसाराला गती दिली.
३) जागतिकीकरणाममुळे मराठवाडी भाषेच्या अंतर्बाह्य स्वरुपात बदल घडलेला आहे.
४) प्रमाण मराठी व मराठवाडी भाषेचे स्वरूप कसे बदलले आहे याची मीमांसा करणे.

**शोधनिबंधाची मर्यादा :** प्रस्तुत शोधनिबंध हा जागतिकीकरणामुळे मराठी भाषा, मराठवाडी बोलीभाषा व साहित्य या अभ्यासकक्षेशी निगडित आहे. याशोधनिबंधात काही निवडक मराठवाडी बोली निरीक्षणे मध्यवर्ती मानली आहेत.

भारतामध्ये सन १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचनेला अनुसरून प्रादेशिक भाषांना सबंधित राज्यातील प्रमाणभाषेचा दर्जा मिळाला. परंतु १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्र हे राज्य स्थापन झाले आणि मराठी भाषेला प्रमाण भाषेचा दर्जा मिळाला. तसेच राजभाषा अधिनियम १९६३ अनुच्छेद ३(३) अन्वये करार, निविदा अथवा अन्य योजनासाठी हिंदी आणि इंग्रजी भाषेचा वापर करणे अनिवार्य केले. अलीकडे युती सरकारच्या काळात मराठी हीच सर्व क्षेत्रातील कामकाजाची भाषा राहील, असा अध्यादेश निर्गमित केला. परंतु वास्तवात त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी झालेली दिसत नाही. जागतिकीकरणामुळे व प्रसारमाध्यमांमुळे सामान्य माणसांना मराठी कधी हिंदीमय तर कधी इंग्रजीमय झाल्याची प्रचिती येते.पूर्वीच्या राज्यकर्त्यांच्या उर्दू - फारशी -फ्रेंच - पोर्तुगीज - डच व इतर शेजारी संपर्कभाषांचा प्रभाव मराठीवर आढळतो. जागतिकीकरणाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट, दूरसंचार माध्यमातील वाहिन्या ,वृत्तपत्रे, नियतकालिके व साहित्य याप्रसारमाध्यमाशी संबंधित बाबींचा मराठवाडी ही मराठीची स्त्रोतभाषा असून सुद्धा सद्यःस्थितीत बोलीभषा म्हणून तिची ओळख का नसावी ? मराठी भाषेवरील नेमका प्रभाव कसा पडला आहे? पडत आहे ? मराठवाडी भाषेचे स्वरूप कसे बदलले आहे ? याबद्दलची ठळक निरीक्षणे यालेखात नोंदविली आहेत.

**संशोधनाचे महत्त्व :** भाषाशास्त्रीय संशोधन ही काळाची गरज आहे. आज बोलीविज्ञानाच्या माध्यमातून बोलीच्या अभ्यासाला चालना मिळत आहे. बोली हा माणसांचा उपजत अलंकार असून संभाषणात सौंदर्य वृध्दिंगत करतो. प्रमाणभाषकांच्या समूहामध्ये अथवा अन्यत्र विनोद निर्मितीसाठी

बोलीचे उपयोजन केले जाते. चित्रपट, नाटक, सभा - संमेलन इत्यादी ठिकाणी परिणामकारक बोलीचा वापर केला जात आहे. रसिक -श्रोत्यांची मने जिंकून मनोरंजन आणि उद्‌बोधन घडविण्यासाठी बोली उपयोजन प्रभावी ठरते.

मराठवाडी बोली हा विषय अभ्यासापासून दुर्लक्षित असून या अभ्यासाला चालना मिळावी. त्यामुळे भाषाशास्त्रीय संशोधनाती पोकळी भरून काढता येईल. मराठवाड्यातील राजकीय,सामाजिक,सांस्कृतिक,ऐतिहासिक वाटचालीचा मागोवा घेण्यासाठी मराठवाडी बोलीच्या अभ्यासातून सुकरता येते. ( कारण सरंजामदार - वतनदार - अस्पृश्य समाजाच्या विशिष्ट लकबी प्रत्ययास येतात. )

**मराठवाडी बोली अभ्यासाच्या दिशा :** उच्चारण आणि लेखन यातील साधर्म्य साधणे आवश्यक ठरेल. व्याकरणिक नियमावलीत बदल घडवून उच्चारानुसारी लेखन शक्य होईल. व्यक्तीच्या बोलण्यातील विशिष्ट उच्चार - हेल - ढब सुयोग्य पकडून लेखनात उपयोजन. माणसांचे प्रादेशिक स्थान, सामाजिक (जात) अथवा सांस्कृतिक दर्जा, त्याचे कार्यक्षेत्रे यांचे साहित्यामध्ये ठळक दर्शन घडविणे. भाषाविशारदांच्या व्यक्तिगत व सामुहिक प्रयत्नांमधून वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या कसोटयाधारे संशेधनापासून वंचित राहिलेल्या मराठवाडी बोलीची उच्चारप्रक्रिया, वर्णप्रक्रिया, व्याकरणप्रक्रिया व प्रत्ययव्यवस्था सिध्द करणे. वाक्यरचनेची वेगळिक, अर्थसंदेशनाची निराळी बाजू आणि पदप्रक्रिया यांच्या कसोटयाधारे मराठवाडी बोलीची मीमांसा करणे उचित ठरेल. भाषाव्यवहारात एकाच समानोच्चारी शब्दाचे किंवा वाक्याचे संदर्भनिष्ठ अर्थ अनेक निर्माण होऊ शकतात. त्यांची संदर्भसापेक्षता शोधणे. मराठवाडयातील जातिबोली, व्यवसायानुसार, धर्म, पंथ, समाज, समाजगट, वय, लिंग, प्रदेश, परिसर या घटकाशी संबंधित बोलीवैविध्य अभ्यासणे. मराठवाडयातील साहित्यिकांनी मराठी वाङ्मयामध्ये योजलेल्या परिसरनिहाय सांस्कृतिक - सामाजिक - प्रादेशिक संदर्भांचा बोलीभाषेचा शोध घेणे.

'दर बारा कोसावर बदलणारी बोली' साहित्य व्यवहारात प्राणतत्त्व बनून कशी आलेली आहे किंवा वापर करता येईल, मानवी व्यवहारात आणि समाज व्यवहारात कशी प्रचलित आहे, याचा मागोवा घेणे. मराठवाडी बोलीवरील परभाषीय संक्रमणांची चिकित्सा करणे, राजकीय - शैक्षणिक - सामाजिक - धार्मिक संक्रमणातून घडलेल्या बोलीची ऐतिहासिकता शोधणे, जतन करणे आणि त्यास लिखितरूप देणे किंवा व्यवहारामध्ये योजणे महत्त्वाचे वाटते. लोकसाहित्यातील लोकवाङ्मय हा बोलीरूप जिवंत आविष्कार आहे. त्यांचे संकलन - संशोधन करणे, मराठी साहित्य आणि समाजातील बोलीवास्तव जमा करणे व त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे. याद्वारे मराठवाडी बोली किंवा इतर बोलींच्या अभ्यासाला पथदर्शक ठरेल, याबद्दल शंका नाहीच. संदेशयंत्रणा (भ्रमणभाष, आंतरजाल, प्रसारमाध्यमे इ.) यांत्रिकीकरण, औद्योगीकरण या आधुनिकीकरणाच्या परिणामामुळे बदलते भाषावास्तव उलगडणे.

**काही निरीक्षणे- निष्कर्ष :** बोलीच्या अभ्यासामुळे कालप्रवाहात नष्ट होणारे बोलीसंचित चिरंतन ठरेल. उच्चारण आणि लेखन यातील साधर्म्य साधता येईल. व्यक्तीच्या बोलण्यातील विशिष्ट उच्चार - हेल - ढब यावरून त्याचे प्रादेशिक स्थान, सामाजिक (जात) अथवा सांस्कृतिक दर्जा ,त्याचे कार्यक्षेत्रे याबद्दल ऐकणाऱ्यास आडाखे बांधता येतात. वर्णनात्मक भाषाविज्ञानाच्या कसोटयाधारे संशेधनापासून वंचित राहिलेल्या मराठवाडी बोलीची उच्चारप्रक्रिया, वर्णप्रक्रिया, व्याकरणप्रक्रिया, व प्रत्ययव्यवस्था सिध्द होईल. वाक्यरचनेची वेगळिक, अर्थसंदेशनाची निराळी बाजू आणि पदप्रक्रिया यांचा उलगडा करता येईल. मराठवाडी बोलीची संदर्भसापेक्षता स्पष्ट करताना भाषासादृश्यता असली तरी एकाच समानोच्चारी शब्दाचे - वाक्याचे अनेक संदर्भनिष्ठ अर्थ निर्माण कसे होतात, याकडे लक्ष वेधता येईल.

मराठवाडयात बोलीवैविध्य निदर्शनास येते. जातिबोली, व्यवसायानुसार, धर्म, पंथ, समाज, समाजगट, वय, लिंग, प्रदेश, परिसर या घटकाशी संबंधित बोलीने विविध मुखवटे धारण केलेली आढळतात. तिच्यात जगण्याचे रंग - तरंग निर्माण झालेले आहेत.

परिसरनिहाय जगण्याच्या प्रभावाचे आगळे पैलू टिपताना सभोवतीच्या सांस्कृतिक - सामाजिक - प्रादेशिक संदर्भांना गडद करताना मराठवाडयातील साहित्यिकांनी मराठी वाङ्मयामध्ये बोलीभाषेचा जाणीवपूर्वक वापर केला आहे, होत आहे. आगामी काळात लेखनात वापर वाढावा. अशा साहित्यकृती बोलीदृष्टया - साहित्यदृष्टया मैलाचा दगड ठरत आहेत. भविष्यकालीन साहित्याचे प्राणतत्त्व बनून खेडयातील व वनातील जगण्यातील वास्तव मुखर करणारी बोली येणे गरजेचे वाटते. स्थलनिहाय - कालानुरूप - परिस्थितीसापेक्ष - परिसरनिष्ठ बोलीभाषा वैशिष्ट्यांची मीमांसा करता येईल. परभाषीय संक्रमण, राजकीय - शैक्षणिक - सामाजिक - धार्मिक संक्रमणातून घडलेल्या बोलीची ऐतिहासिकता शोधणे, जपणे आणि त्यास लिखितरूप देणे महत्त्वाचे वाटते. लोकसाहित्य संकलन - संशोधन करणे, मराठी साहित्य आणि समाजातील बोलीभांडार जमा करणे व त्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे हीच मराठवाडी बोली व इतर बोली जिवंत ठेवण्यासाठी मूलभूत प्रक्रिया आहेच. भ्रमणभाष, आंतरजाल, प्रसारमाध्यमांमुळे बदलते भाषिक रसायन लक्षवेधी आहे. करिता बोली अभ्यासकांनी पुढाकार घेऊन मराठवाडी बोलीच्या अध्ययनासाठी संघटितपणे प्रयत्न करावेत, गती द्यावी, नष्ट होणारे बोलीवैभव सांभाळावे, पुढील पिढीकडे सुपूर्द करावे ! हीच अपेक्षा ....

# जागतिकीकरणाचे मराठी भाषा आणि साहित्या पुढील आव्हाने व उपाय

संपादक
प्रा.यु.पी. सुपारे
मराठी विभाग प्रमुख

* प्रकाशक *
प्र.प्राचार्य प्रा.एस.जी. तळणीकर
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सेनगांव
जि.हिंगोली
फोन : (०२४५६) २०२४६५, २५०४६२
www.toshniwalacs.com | E-mail : prin.taccs212@rediffmail.com

प्रथम आवत्ती : ०४ जानेवारी २०२०

ISBN : 978-1-79482-974-9

* मुद्रक *
महेश ऑफसेट, परभणी

मूल्य : २५०/-

या पुस्तकातील सर्व शोधनिबंध लेखकाची मौखिल परवानगी ग्राह्य धरूनच हे शोधनिबंध एकत्रित करण्यात आले असून, त्या मतांशी संपादक व प्रकाशनक सहमत असतीलच असे नाही.

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशनाधीन असून या पुस्तकातील कोणताही मजकूर, तक्ता किंवा तत्सम संकल्पना यांची कोणत्याही प्रकारे नक्कल करणे किंवा यांत्रिकी साधनांनी फोटो कॉपी, रेकॉर्डींग करणे कायद्याने गुन्हा असून असे आढळून आल्यास तात्काळ कारवाई करण्यात येईल.